श्री.गणपत जानकू सुकटे, उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा खांडगाव,ता.संगमनेर जि.अहमदनगर यांचे गैरवर्तनाबाबत पदावरुन तात्पुरत्या स्वरुपात दूर करणबाबत

अहमदनगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथमिक)
आदेश क्र.कार्या-2/खाचौ/1224/ 342/2024
अहमदनगर दि. 10/ 06 /2024

ज्याअर्थी श्री.गणपत जानकू सुकटे, उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा खांडगाव,ता.संगमनेर जि.अहमदनगर येथे कार्यरत असताना गावातील अल्पवयीन विद्यार्थीनीस अश्लिल संदेश असलेली वही देणे, त्यांचे स्वत:चे वर्गात अश्लिल मजकुर असलेले भेटकार्ड, वही प्राप्त होणे, तसेच वर्गात धोकादायक हत्यार सापडणे, पालकांशी तसेच शाळेतील सहशिक्षकांशी वाद घालणे, सहशिक्षकांना धमकावणे, शालेय वेळेत मोबाईलवर गेम खेळणे आदी प्रकारचे गैरवर्तन केलेची बाब प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे. प्रकरणी त्यांनी गैरवर्तन केल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 चा 3 भंग केला आहे.त्यानुसार तुमचे विरुध्द शिस्तभंग कारवाई करण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर मला महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम 1964 चे भाग 2 मधील नियम 3 अन्वये मला प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन याव्दारे उक्त श्री.गणपत जानकू सुकटे, उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा खांडगाव,ता.संगमनेर जि.अहमदनगर जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करीत आहे.

आणखी असाही आदेश देत आहे की हा आदेश अंमलात राहिल तेवढया कालावधीत श्री.गणपत जानकू सुकटे, उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा खांडगाव,ता.संगमनेर जि.अहमदनगर यांचे मुख्यालय पंचायत समिती जामखेड येथे राहिल आणि उक्त श्री.गणपत जानकू सुकटे, उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा खांडगाव,ता.संगमनेर जि.अहमदनगर यांना गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती जामखेड यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्री.गणपत जानकू सुकटे, उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा खांडगाव, ता.संगमनेर जि.अहमदनगर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा आणि निलबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम 1981 मधील नियम 68 च्या तरतुदीनुसार निलंबन भत्ता देण्यात यावेत.

निलंबनाच्या कालावधीत श्री.गणपत जानकू सुकटे, उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा खांडगाव,ता.संगमनेर जि.अहमदनगर यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये,त्यांनी तसे केल्यास ते दोषारोप त्यांच्यावर ठेवण्यात,तसेच ते निलबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.निलंबनाच्या कालावधीत निलंबन निर्वाह भत्ता जेव्हा जेव्हा देण्यात येईल,त्यावेळी आपण खाजगी नोकरी स्विकारली नाही अथवा कोणताही खाजगी धंदा वा व्यवसाय करीत नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र श्री.गणपत जानकू सुकटे, उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा खांडगाव,ता.संगमनेर जि.अहमदनगर यांना सादर करावे लागेल.

निलंबनाच्या कालावधीत श्री.गणपत जानकू सुकटे, उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा खांडगाव,ता.संगमनेर जि.अहमदनगर यांना निलंबन निर्वाह भत्ता देण्याबाबतची कार्यवाही गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती संगमनेर जि.अहमदनगर हे करतील.

सदरचा आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 202406101600091 असा आहे.

Signed by Ashish
Mukundrao Yerekar
Date: 10-06-2024 14:07:29

(आशिष येरेकर,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,
श्री.गणपत जानकू सुकटे, उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा खांडगाव, ता.संगमनेर जि.अहमदनगर
व्दारा- गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती संगमनेर

प्रत:- गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती संगमनेर
2/-सदरचा आदेश संबंधितास बजावून दुस-या प्रतिवर प्रत मिळाले बाबतची दिनांकित स्वाक्षरी घ्यावी व पोहच त्वरीत इकडेस सादर करावी.
प्रत:-गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती जामखेड जिल्हा अहमदनगर